27 NOV 2020

**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**(पदविका प्रथमवर्ष अभ्यासक्रम प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक शैक्षणिक वर्ष २०२०-२१ )**

मा. सर्वोच न्यायालय, नवी दिल्ली यांनी एसईबीसी आरक्षणासंदर्भात दि. ०९/०९/२०२० दिलेल्या स्थगिती आदेशाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मधील पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेमध्ये आरक्षणासंदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत –

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील मुलभूत (१ वर्ष), कलाशिक्षक प्रशिक्षण (२ वर्ष), आर्ट मास्टर (प्रमाणपत्र), रेखा व रंगकला (४ वर्ष ), उपयोजित कला(४ वर्ष), शिल्पकला व प्रतिमानबंध (४ वर्ष), अंतर्गत गृहसजावट (२ वर्ष), वस्त्रकाम (टेक्सटाईल) ( प्रिंटींग अँण्ड विविंग) (२ वर्ष), मातकाम (सिरॅमिक व पॉटरी)(२ वर्ष)आणि कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड)(१ वर्ष) या पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची प्रथम वर्षाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या तारखेमध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यांत येत आहे.

**प्रवेशासाठी सुधारित ऑनलाईन नोंदणी :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या बीसीसी-२०२०/प्र.क्र.२९५/१६-ब,दिनांक २४/११/२०२० रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थामधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी एसईबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील अशा विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश दिले जाणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी एसईबीसी प्रवर्गातून प्रवेश अर्ज सादर केला आहे त्यापैकी जे विद्यार्थी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) प्रवर्गामधून प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेश अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी दिनांक २७/११/२०२०पासून ०५/१२/२०२० पर्यंत http://cetcell.net/doa/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी वरील अभ्यासक्रमांकरिता अद्याप ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर केले नसतील त्यांनाही उक्त कालावधीत ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करता येईल.

विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी दि.०७.१२.२०२० रोजी http://cetcell.net/doa/ तसेच www.doa.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल, पुढील प्रवेश प्रक्रियेबाबतच्या तारखा वरील संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.याची सर्व सबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
(भा.ना.तिखे)
निरीक्षक चित्रकला व शिल्प
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सही/-
(राजीव मिश्रा)
कला संचालक
कला संचालनालय, म.रा.मुंबई.

Scanned by TapScanner